# कुटूंबावर जात पंचायतीने टाकला सामाजिक बहिष्कार

## दहा जणांवर गुन्हा ● गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 10)** पती-पत्नीसह दोन मुलांवर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आल्याची एक गंभीर घटना 9 जानेवारी रोजी गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी संबंधित महिलेच्या तक्रारीवरून जात पंचायतीतील दहा जणांविरुद्ध पोलिसांनी महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम 5, 7 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

दीपक पांडुरंग पवार, सुधाकर पवार, देवेंद्र सूर्यवंशी, धनराज पवार, शैलेश पवार, मनीष सूर्यवंशी (सर्व रा. विलासनगर, अमरावती), किशोर पवार, ज्ञानेश्वर पवार, खेमराज सोळंके (तिघेही रा. जुनी वस्ती, बडनेरा) व देवा पवार (रा. तिवसा) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. यातील तक्रारदार महिलेचे लग्न रितीरिवाजाप्रमाणे झाले असून त्यांना दोन मुले देखील आहेत. महिलेला दुसरा मुलगा झाला, तेव्हा त्या माहेरी आईकडे होत्या. त्यावेळी अन्य एक महिला त्यांच्याकडे आली. मी तुझ्या नवऱ्यापासून गर्भवती आहे. मला तुझ्या नवऱ्यासोबत लग्न करायचे आहे, आता तर तुझ्या नवऱ्याला मला घरात घ्यावेच लागेल, असे ती महिला त्यांना म्हणाली. त्या महिलेने तक्रारदार महिलेच्या पतीवर बलात्काराचा गुन्हा दाखल केला होता.

### लग्न कर अथवा बहिष्कार

याबाबत तक्रारदार महिलेने आपल्या पतीला विचारपूस केली. त्यावर त्यांनी आपले लग्नापूर्वी त्या महिलेसोबत प्रेमसंबंध होते. त्यावेळी तिला लग्नाबाबत विचारले होते. मात्र, तिने लग्न केले नाही, असे त्यांनी त्यांना सांगितले. दरम्यान, त्या महिलेने विलासनगर येथील संबंधित जात पंचायत कार्यालयात तक्रारदार महिलेच्या पतीविरुद्ध तक्रार केली. त्यावर पंचायतने तक्रारदार महिला व त्यांच्या पतीला बोलावून घेतले. त्या महिलेसोबत लग्न कर, असा आदेश यावेळी तक्रारदार महिलेच्या पतीला देण्यात आला. त्यावर त्यांनी नकार दिला. त्यामुळे जात पंचायतमध्ये असलेल्या संबंधित दहा जणांनी तक्रारदार महिला, त्यांचे पती व त्यांच्या दोन मुलांना समाजामधून बाहेर काढल्याचा निर्णय दिला.

### कुणी बोलल्यास त्यालाही समाजाबाहेर काढू!

समाजातील कुणी व्यक्ती तक्रारदार महिला किंवा त्यांच्या कुटुंबाशी बोलल्याचे आढळल्यास त्यांनासुद्धा समाजाबाहेर काढून टाकले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. तेव्हापासून आपल्यासह पती व दोन मुलांवर समाजासह नातेवाइकांनीसुद्धा बहिष्कार टाकल्याची तक्रार महिलेने गाडगेनगर ठाण्यात दाखल केली. तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# लिव्ह इन रिलेशनशिप मधील महिलेची हत्या

## खरपी परिसरातील शेतशिवारात घटना



## आरोपीला अटक

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,(दि.10)-** तालुक्यातील शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खरपीजवळ असणार्या शेतशिवारातील एका झोपडीत 10 जानेवारी रोजी सकाळी एका महिलेचा रक्तबंबाळ अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासात सुनंदा लखन ठाकरे (वय 50, रा. मध्य प्रदेश) असे मृत महिलेचे नाव असल्याची माहिती पुढे आली आहे. लिव्ह इन रिलेनशिपमध्ये राहणाऱ्या या महिलेच्या डोक्यावर काठीने वार करून, तिची हत्या करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. याप्रकरणात शिरजगाव पोलिसांनी आरोपी सुनील मरकाम (रा. मध्यप्रदेश) याला काही तासांतच अटक केली.

मध्यप्रदेशातून अनेक नागरिक अमरावती जिल्ह्यात मजुरी कामाकरिता येतात. अशातच शिरजगाव येथील एमएसईबीचे निवृत्त अभियंता पाटेकर यांच्या शेतातील कामांसाठी सुनिल मरकाम हा आला होता. तो शेतातील झोपडीत एका महिलेसोबत राहत होता. गेल्या काही वर्षांपासून सहमतीने लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. त्यांच्यातील काही वादातून आरोपीने ही हत्या केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या घटनेच्या माहितीवरून पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. याप्रकरणी शिरजगाव पोलीस अधिक तपास करत आहेत. घटनेचे गांभीर्य पाहून अचलपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी शुभम कुमार, स्टेशन प्रभारी महेंद्र गवई व पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी श्वानपथकालाही घटनास्थळी पाचारण केले. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# चुकीचा उपचार करणाऱ्या डॉक्टरवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

- बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटना
- पोलिस चौकशीत उघड

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.10)-** चुकीच्या पध्दतीने व निष्काळजपणा उपचार केल्याने एका रुग्णाचा मृत्यू झाल्याची घटना 14 ऑगस्ट 2023 मध्ये बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली होती. याप्रकरणातील तपासाअंती बडनेरा पोलिसांनी 9 जानेवारी रोजी एका डॉक्टराविरुध्द सदोष मनुष्यवधाच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. डॉ. नंदकिशोर लक्ष्मणराव धुरतकर (70, रा. जुनीवस्ती, बडनेरा) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिस सुत्रानुसार, 18 ऑगस्ट 2023 रोजी तेजस नंदु मेश्राम (16, रा. बारीपुरा, जुनीवस्ती, बडनेरा) याला अचानक ताप येऊन त्याची प्रकृती बिघडली होती. त्यामुळे त्याला डॉ. नंदकिशोर धुरतकर यांच्याकडे उपचाराकरिता नेण्यात आले होते. त्यानंतर त्याला डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले. परंतू प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्याला पुढील उपचाराकरिता नागपूर येथील मेडिकल कॉलेजमध्ये रेफर करण्यात आले होते. 24 ऑगस्ट 2023 रोजी उपचारादरम्यान तेजस मेश्रामचा मृत्यू झाला. याप्रकरणात नागपूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. त्यानंतर तपास डायरी ही बडनेरा पोलिसांना प्राप्त झाली. पोलिसांनी कलम 174 जा. फौ. प्रमाणे नोंद करून चौकशी सुरु केली. यामध्ये पोलिसांनी मृतक तेजसचे वडिल नंदु शामरावजी मेश्राम यांचे बयाण नोंदविले. त्यांच्या बयाणानुसार चुकीच्या उपचारामुळे व डॉक्टरच्या निष्काळजीपणाने तेजसचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले.

### जिल्हा शल्य चिकीत्सकांनी दिला अहवाल

या अनुषंगाने बडनेरा पोलिसांनी डॉ. धुरतकर यांनी केलेल्या उपचाराची माहिती घेतली. त्यांनी दिलेल्या औषधी गोळ्यांची पाहणी केली. त्यानंतर या औषधोपचाराबाबत तपासणीच्या अनुषंगाने पोलिसांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याशी पत्र व्यवहार केला. त्यानंतर जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालयाकडून पोलिसांना अहवाल प्राप्त झाला. या अहवालात विना प्रशिक्षण व माहिती नसताना डॉक्टरने तेजस मेश्रामवर उपचार केला आणि निष्काळजीपणा केल्याची माहिती पुढे आली. या अभिप्रायानंतर बडनेरा पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक सुरेंद्र पाटील यांच्या तक्रारीवरून बडनेरा ठाण्यात आरोपी डॉ. नंदकिशोर धुरतकर याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला.

# अंकुश सावळे पहिल्या प्रयत्नात झाला पीएसआय

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, (दि.10) -** अजंनगाव सुर्जी तालुक्यातील कोकर्डा या गावातील अंकुश प्रमोदराव सावळे यांनी वयाच्या 27 व्या वर्षी पोलीस उपनिरीक्षक परीक्षा उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे. पहिल्याच प्रयत्नात यशाला गवसणी घातल्याने अकुंशचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अंकुश सावळे यांची संपूर्ण महाराष्टातील रँक 436 आहे. अंकुश यांच्या कुटुंबाची परिस्थिती जेमतेम असताना अत्यंत मेहनत, जिद्द, चिकाटीने अंकुश यांनी अभ्यास केला. पदवी झाल्यानंतर त्यांनी एमपीएससी देण्याचा निर्णय घेतला. चिकाटीने अभ्यास केला आणि पहिल्याच प्रयत्नात अवघड असे यश मिळवले आहे. ग्रामीण भागात जन्म झाला असल्यामुळे कोकर्डा येथील जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण केले माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सर्वोदय हायस्कुल येथे पूर्ण केले तर पदवीचे शिक्षण दारापूर इंजिनिअरिंग कॉलेज येथून पूर्ण केले. वडिलांचे परिश्रम बघता सक्षम व समाजपयोगी कार्य करायचे असेल तर स्पर्धा परीक्षेतील सामोरे जाण्याचा निश्चय अंकुशने केला. पदवीचे शिक्षण झाल्यानंतर स्पर्धा परीक्षेची तयारी सुरु केली. स्पर्धा परीक्षेकरता कुठलाही क्लास जॉईन न करता स्वत: तासन तास अभ्यास सुरू करून त्याने हे यश संपादन केले आहे.




### अंकुशच्या यशात कुटुंबाचा मोठा वाटा

अंकुश एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन पोलीस उपनिरीक्षक होणार आहे. त्याच्या यशामध्ये वडील प्रमोदराव सावळे, आई मंगला प्रमोदराव सावळे, बहीण कल्याणी प्रमोदराव सावळे यांचा मोठा वाटा आहे. वडिलांनी दिलेला आत्मविश्वास, आईने दिलेली साथ, बहिणीने केलेले मार्गदर्शन त्यामुळेच पहिल्याच प्रयत्नात यश मिळाले असल्याचे अंकुश सावळे यांनी 'दै.महासागर' ला सांगितले.

### रहाटगाव आय टी आय येथे युवा उद्योजक महोत्सव

**अमरावती-** स्थानिक दादासाहेब खापर्डे औद्योगिक प्रशिक्षण संस्था रहाटगाव येथे रविवारी दि. 12 जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद तसेच राजमाता जिजाऊ साहेब यांच्या जयंतीनिमित्ताने युवा उद्योजक महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्याचे स्वातंत्र्यसेनानी दादासाहेब खापर्डे यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान याबाबत मार्गदर्शन तसेच देशाच्या विकासात कौशल्याचे महत्व यावर वकृत्व स्पर्धा तसेच निबंध स्पर्धा चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या आहे. तसेच युवकामध्ये मैदानी खेळाचे महत्व वाढविण्यासाठी क्रिकेट, कबड्डी, खोखो , बॅडमिंटन तसेच बुध्दीबळ स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

# अल्टो कारच्या धडकेत ऑटो रिक्षातील एकाचा मृत्यू

## सात जखमी | तिवसा फाट्याजवळील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि.10)-** भरधाव अल्टो कारच्या धडकेत ऑटोरिक्षातील एकाचा मृत्यू झाला, तर सहा ते सात जण जखमी झाले. या अपघातात नंदकिशोर रामदास अधिवकार (42, रा. तुळजापूर गडी ता. चांदूरबाजार) यांची घटनास्थळावर मृत्यू झाला, जखमीमध्ये शिलाबाई ओंकारराव महानकर (55, रा. सोनोरी), सुभद्राबाई नामदेवराव अडवकर (70, रा. तुळजापूर गडी), लता राजेंद्र तांबटकर (55, रा. शिरसगाव बंड), जानकी अरुण तांबटकर (65, रा. शिरजगाव बंड), ओंकार पुंडलिकराव महानकर (65, रा. सोनोरी), शकुंतला विठ्ठलराव तांबटकर (75, रा.शिरजगाव बंड) व ऑटो चालक वसीमोदिन नईमुद्दीन (30, रा.चांदूरबाजार) यांचा समावेश आहे. तेरवीचा कार्यक्रम आटोपून आपल्या गावी परत जात असतांना प्रवासी ऑटो व मारुती अल्टो गाडीच्या आमने सामने धडकले आहे. सदर घटना 9 जानेवारी रोजी सायंकाळी 6:30 वाजताचे दरम्यान तिवसा फाट्याजवळ घडली.

चांदूरबाजार तालुक्यातील तुळजापूर गढी येथील आधवीकार कुटुंब मोर्शी येथे तेरवीच्या कार्यक्रमानिमित्त आले होते. कार्यक्रम आटोपून सायंकाळी 5 वाजताचे सुमारास आपल्या गावी ऑटो रिक्षा क्रमांक एमएच 49 एआर 2838 ने परत जात होते. दरम्यान चांदूरबाजार बाजार वरून मोर्शीकडे जाणाऱ्या अज्ञात मारुती अल्टो गाडीने ऑटोला जोरदार धडक दिली. या अपघातात ऑटोमधील प्रवासी नंदकिशोर रामदास अधविकार याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच शिरखेडचे ठाणेदार सचिन लुले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची अधिनस्त पोलीस चमू यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि ऑटोमधील जखमी झालेल्या चार रुग्णांना चांदूरबाजार येथील ग्रामीण रुग्णालय भरती केले. या रुग्णाची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले असून शिरखेड पोलीस फरार झालेल्या मारुती अल्टोचा शोध घेत आहे. पुढील तपास शिरखेडचे ठाणेदार सचिन लूले यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक राहुल गवई, हवालदार संजय वाघमारे, नितेश वाघ करीत आहेत. ठाणेदार सचिन लुले यांनी चांदूर बाजार उपजिल्हा रुग्णालयात जाऊन जखमीची चौकशी केली.

# शहर पोलिस तक्रार निवारण अभियान

## वसंत हॉल येथे 13 ते 16 जानेवारी दरम्यान कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.10) -** अनेक नागरिक आपल्या समस्यांबाबत पोलिस ठाण्यात तक्रारी करतात. येथे गुन्ह्याच्या स्वरूपानुसार गुन्हा दाखल केला जातो. मात्र अनेक वादांमध्ये चौकशीअंती कायदेशीर कारवाई केली जाते.

कोणत्याही कारणास्तव प्रलंबित असलेल्या वादावर योग्य व कायदेशीर कारवाई करण्यासाठी तिन्ही विभागांचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, तमाम पोलिस निरीक्षक, ज्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे वादाचे अर्ज गुन्हे शाखेकडे प्रलंबित आहेत, ते येथे उपस्थित राहून प्रकरणे निकाली काढतील. या कालावधीत शहरातील नागरिकांना त्यांच्या समस्या सीपींना कळवून त्या सोडविता येणार आहेत. त्यांना समस्यांबाबत काही तक्रार करावयाची असल्यास अशा तक्रारीही येथे उपस्थित राहून त्यांच्या तक्रारींचे निराकरण करता येईल. यासाठी 13 ते 16 जानेवारी या कालावधीत तक्रारींचे निराकरण करण्यात येणार आहे. या मोहिमेत सहाय्यक पोलिस आयुक्त स्वत: वरिष्ठ स्तरावरील तक्रार अर्ज आणि स्थानिक स्तरावरील प्रलंबित अर्जांची चौकशी करून जास्तीत जास्त अर्जांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची खातरजमा करतील. पोलिस तक्रार निवारण अभियानाला पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी स्वत: उपस्थित राहणार आहेत.

# गोविंदा.... गोविंदा... वैकुंठद्वाराचे दर्शन घेण्याकरिता भक्तांची रिघ

## बालाजी मंदिरात कडाक्याच्या थंडीत पहाटे 5 वाजल्यापासूनच गर्दी





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.10)-** वसंत चौक येथे असलेल्या तिरुपती बालाजी मंदिरात वैकुंठ एकादशीच्या शुभमुहूर्तावर शुक्रवारी पहाटे 5 वाजल्यापासून भाविकांनी गर्दी केली. 8-10 अंश तापमान असतानाही बालाजी, लक्ष्मी माता व पद्मावती मातेची पालखी उचलण्यासाठी आणि पहाटेच्या आरतीसाठी शेकडोच्या संख्येने भाविक भक्त सहभागी झाले. श्रीनिवासा गोविंदा, व्यंकटरमणा गोविंदा अशा प्रकारे जयजयकार करण्यात आला. पारंपारिक वाद्यांच्या तालावर सकाळी उत्साहात निघालेल्या पालखीमुळे भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

वैकुंठ एकादशीनिमित्त पहाटे भगवान तिरुपती बालाजीचा विशेष अभिषेक करण्यात आला. पारंपारिक मंत्रोच्चार करून पुजारी गौरव स्वामी बालाजी स्वामी, पांडे स्वामी, आवेश स्वामी आदींनी अभिषेक केला. अनेक भाविकांनी बाहेरही प्रसादाची व्यवस्था केली होती. सकाळच्या सत्रात साबुदाणा खिचडी व दुधाचे वाटप करण्यात आले. दुपारच्या सत्रात गूळ चिक्की, केळी, दूध, उसळ, उकडलेली फळे यांचा प्रसाद वाटप करण्यात आला. हजारो भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. प्रशांत देवीकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी साबुदाणा खिचडी व इतर प्रसादाची व्यवस्था केली. अशोक नागला यांच्या हस्ते मसाला दूध वाटप करण्यात आले. गेल्या दीड दशकापासून हे भाविक मंदिरात आनंदाने ही सेवा देत आहेत.

### सुवर्ण स्तंभाचे घेतले दर्शन

वैकुंठ एकादशीच्या शुभमुहूर्तावर तिरुपती बालाजी मंदिराला फुलांच्या माळा, रोषणाई, केळीचे खांब आणि प्रवेशद्वारावर आम्रपल्लवांची सजावट करण्यात आली होती. सुवर्ण स्तंभावर माथा टेकवित भाविकांनी नमन केले. बालाजी मंदिराचे सर्व विश्वस्त एड. आर.बी.अटल, जगदीश प्रसाद अग्रवाल, नारायणदास अग्रवाल, नरेश अग्रवाल, जुगलकिशोर गट्टानी, राजेश हेडा, अरुण पटेरिया, गोविंद दायमा, रमण दायमा, काकडाजी, पुरुषोत्तम गोयंका, देवदत्त जोशी, सुनील गांधी, विजय खंडेलवाल, श्रीनिवास भट्टड, श्रीनिवास भटके, श्रीनिवास वलयिक, वलयिंद पाटील, डॉ. , नारायणराव उपकार, मोतीलाल अग्रवाल, आनंद सिकची, कुशल पांचाळ, वर्षा किस्कैया तसेच भाविक जन सर्वश्री कन्हैया गोयल, श्रीकिसन व्यास, गणेश अग्रवाल, उमेश पनपलिया, प्रशांत लाहा, सुयोग लढा, पवन लढा, विशाल लाहा, सचिन साहू, आनंद सुहिल सारडा, डॉ. शारदा यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते.

# दोन महिला सावकारांकडे धाड

## अनेक दस्तावेज केले जप्त



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.10)-** जिल्ह्यातील मोर्शी येथे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाकडून दोन महिला सावकारांकडून धाड टाकण्यात आली. यावेळी त्यांच्याकडून अनेक आक्षेपार्ह दस्तावेज जप्त करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

झटाले व राजपूत असे त्या महिला सावकाराचे आडनाव मिळाले आहे. ही कारवाई सहायक निबंधक, सहकारी संस्था, मोशी यांच्या कार्यालयास अवैध सावकारी संदर्भात प्राप्त तक्रारीवरुन करण्यात आली. जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी दोन पथकाची नेमणुक करुन अप्पर वर्धा क्वार्टर मोर्शी येथे धाडोची व झडतोची कार्यवाही करण्यात आली.

सदर दोन्हो धाड पथकास अवैध सावकारी संबधाने प्राप्त दस्तऐवज पुढील चौकशीकरिता सहायक निबंधक मोर्शी कार्यालयाला चौकशीकरिता देण्यात आले. पथक क्र. एकमध्ये पथक प्रमुख स्वाती गुडधे, सुधीर मानकर, प्रदीप देशमुख. सुष्मीता सुपले, राहुल पुरी. पथक यांचा समावेश होता. तसेच पथक क्रमांक दोन मध्ये पथक प्रमुख प्रीती धामणे, अविनाश महल्ले, नंदकिशोर दहिकर, सुनिल पंडागळे, किशोर भूस्कडे तसेच पंच म्हणून रजत पाटील. मोहीत अढाऊ, सोमेश्वर राऊत, अक्षय गायकी तसेच मोर्शी पोलीस स्टेशनचे कर्मचारी उपस्थित होते. सदर प्रकरणात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 मधील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही राजेश भुयार, सहायक निबंधक, सहकारी संस्था, मोर्शी करणार आहे.

# कुंभमेळ्याच्या नावाने होऊ शकते फसवणूक

## सायबर गुन्हेगारांपासून सावध राहण्याचे पोलिसांचे आवाहन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि, 10 ) –** कुंभमेळ्याच्या नावाचा गैरवापर करण्यासाठी काही सायबर चोरटे सक्रिय झाले असून, त्याद्वारे फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सावध राहावे, असे आवाहन पोलीस विभागाकडून केले जात आहे. कुंभमेळा या धार्मिक कार्यक्रमांच्या निमित्ताने सायबर गुन्हेगार इंटरनेटच्या माध्यमातून डिजिटल सुविधेचा गैरवापर करून भाविकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेतात. बनावट वेबसाइट, लिंक किंवा इतर माध्यमांचा वापर करून नागरिकांची फसवणूक करतात.

ही बाब भारत सरकार गृहमंत्रालयाच्या निदर्शनास आली आहे. बनावट वेबसाइटद्वारे कुंभमेळ्यासाठी देणगी गोळा करण्याच्या नावाखाली बनावट वेबसाइटचा वापर करून आर्थिक फसवणूक केली जात आहे. तसेच ऑनलाइन बुकिंगद्वारे फसवणूक करण्याकरिता भाविकांसाठी निवास व्यवस्था, दर्शन पास इत्यादी बुकिंगच्या नावाखाली बनावट वेबसाइटद्वारे पैसे उकळले जात आहेत.


### ही घ्या खबरदारी- बनावट लिंक टाळा


- कुंभमेळासंबंधी बनावट लिंक, बेवसाइट्स किंवा मेसेजवर क्लिक करू नका.
- सत्यता तपासा = कुंभमेळासंबंधी अधिक माहितीसाठी https://kumbh.gov.in अधिकृत वेबसाइटवर संपर्क साधावा.
- आपली गोपनीय माहिती शेअर करू नका = बँक खाते क्रमांक, पासवर्ड किंवा इतर कोणतीही संवेदनशील माहिती कोणालाही देऊ नका.
- फसवणुकीचा संशय आल्यास सायबर हेल्पलाइन cybercrime.gov.in किंवा 1930 या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा.




# ‘लठ्ठम लठ्ठा’ च्या राजकारणात प्रशासन सुखात!

## मतदारसंघातील जनतेच्या समस्यांचा चोथा







> अचलपूर मतदार संघात सध्या 3 फूट आणि 6 फूट लठाचे राजकारण चांलले आहे. मात्र प्रशासकीय यंत्रणेवर कुणाचाच वचक नाही. सामान्य जनतेची नाहक ससेहोलपट होत आहे. प्रशासनाला शिस्त लावण्याकरिता आम्हालाही आमचा 9 फुटाचा लठ काढावा लागेल.
>
> **रमण लंगोटे, लोकविकास संघटना**

> आज तहसील कार्यालयात कामा निमित्ताने गेलो होतो. मात्र वेळ होऊन देखील नायब तहसीलदार, अधिकारी कर्मचारी हजर नव्हते. त्यामुळे यांच्यावर कुणाचेच अंकुश नसल्याने सामान्य जनता त्रस्त आहे.
>
> **पंजाबराव मोहोड, तळेगाव.**

> अधिकारी, कर्मचारी तहसीलदार यांनी विविध वेळेत हजर राहणे आवश्यक असते. मात्र तहसील कार्यालयाचा कारभार नीट न झाल्यास आंदोलन करू.
>
> **आशिष झटाले, प्रहार कार्यकर्ता.**

> तहसीलदार यांच्या सोबत बोलून माहिती घेतो.नंतर काय करता येईल ते नक्की करू.
>
> **प्रवीण तायडे, आमदार, अचलपूर.**

> अधिकारी कर्मचारी यांचे स्पोर्ट असल्याने कोणी आपल्या वैयक्तिक कामात व्यस्त असेल त्रिंबपन या संदर्भात तहसीलदार यांच्या सोबत बोलतो.
>
> **बळवंत आरखराव, उपविभागीय अधिकारी, अचलपूर.**

**बादल डकरे**

**चांदूर बाजार,( दि.10 ) –** अचलपूर विधानसभा मतदारसंघात सध्या आजी–माजी आमदारांमध्ये ‘लठ’ काढण्याची भाषा नागरिकांच्या खरपूस चर्चेचा विषय ठरत आहे. मात्र या ‘लठ्ठम लठ्ठा’ च्या राजकारणात तालुका प्रशासन सुखात दिसत आहे. कोणत्याच लोकप्रतिनिधीचे लक्ष त्यांच्याकडे नसल्याने मनमर्जी कार्यक्रम सुरु आहे. वाटेल तेव्हा कार्यालयात उपस्थित रहायचे, वाटेल तेव्हा निघून जायचे. कामाकरिता कार्यालयात आलेल्या नागरिकाला सहज आल्या पावली परत पाठवायचे, असा प्रकार सुरु आहे. ज्याकडे लोकप्रतिनिधींच सपशेल दुर्लक्ष होत आहे. खुन्नस च्या राजकारणात नागरिकांच्या समस्यांचा ‘चोथा’ होत असलेला दिसत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरेंनी प्रशासकीय कार्यालयांना 5 दिवसांचा आठवडा करुन कार्यालयांची वेळ सकाळी 9.45 ते 5.45 अशी ठरवून दिली. परंतू तालुक्यातील तहसील कार्यालयातील कर्मचारी कुणालाच न जुमानता मनात येईल त्या वेळेवर कार्यालयात येतात. गुरुवार(दि.9) रोजी सकाळी 10.30 मिनिटांचा वेळ झालेला असताना तहसील कार्यालय रिकामे पहायला मिळाले. पुरवठा विभागात एक कारकून, नैसर्गिक आपत्ती विभागात 1 कारकून तर 6 शिपाई व 1 कोतवाल इतकेच कर्मचारी कार्यालयात उपस्थित होते. बाकीचे कर्मचारी मर्जीनुसार तहसील कार्यालयात येत असल्याचे दिसून आले आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी निवासी नायब तहसीलदार हे देखील मुख्यालयीन राहत नसून ते देखील अमरावतीवरून उपडाऊन करतात.

# फळ उत्पादक शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीची नुकसान भरपाई द्यावी!

## आमदार चंदू यावलकर यांची मुख्यमंत्र्यांना विनंती

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.10 ) –** अमरावती जिल्ह्यातील फळ उत्पादक शेतकऱ्यांना विशेष बाब म्हणून तातडीने मदत मिळावी, यासाठी वरुड–मोर्शी मतदारसंघाचे आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी पुढाकार घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे माहे जुलै ते ऑगस्ट 2024 या कालावधीत नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या फळबाग लागवड शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत आमदार चंदू यावलकर यांनी विनंती केली. त्याच अनुषंगाने मदत



व पुनर्वसन मंत्री मकरंदजी जाधव यांना अमरावती जिल्ह्याकरिता 138 कोटी मिळावे, यासाठी मागणी केली आहे. त्यात वरुड–मोर्शी मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या फळगळतीचे (संत्रा, मोसंबी) अतिवृष्टिमुळे झालेले नुकसान भरपाई मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला.

अमरावती जिल्ह्यातील माहे जुलै, ऑगस्ट 2024 या कालावधीत संततधार पावसामुळे फळबाग लागवडीचे नुकसान झाले होते. तसेच संत्रा पिकाचे मोठे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले आहे. संततधार पावसामुळे झालेले नुकसान फक्त आर्थिकच नव्हे, तर सामाजिक स्तरावर शेतकऱ्यांच्या रोजच्या जीवनावरही गंभीर परिणाम करत आहे. अनेक शेतकरी कर्जबाजारी होण्याच्या उंबरठ्यावर आहेत.वर्धा जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या फळबाग लागवड शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. त्याच धरतीवर अमरावती जिल्ह्यात विशेष बाब म्हणून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी याकरिता मुख्यमंत्री व मदत व पुनर्वसन मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# लवादा येथे रासेयो विशेष शिबीराचा समारोप

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी, ( दि.10 )–** दयाराम पटेल स्मारक ट्रस्ट द्वारा संचालित नानासाहेब भिसे कनिष्ठ महाविद्यालय दुनी यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष ग्रामीण शिबिराचा समारोप करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा विणा मालवीय उपस्थित होत्या, तर मुख्य अतिथी म्हणून रमेशपंत जिराफे तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष प्रदीप भिसे संस्थेच्या सदस्या वैशाली भिसे,




माधुरी भिसे, अरविंद मेहता तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महान कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगेबाबा, सावित्रीबाई फुले व नानासाहेब भिसे यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी शिबिरातील आपले अनुभव उपस्थित मान्यवरांसमोर व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिशा कस्तुरे हिने तर आभार समृद्धी वाघ यांनी केले. या शिबीरामध्ये शौच खड्डे, नदीवर बंधारा निर्मिती आणि गावातील साफसफाई करण्यात आली, तसेच आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. सदर शिबीर कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य विजय वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

# बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालयाचा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.10 ) –** येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालय बिगिनर इंग्लीश स्कुल, ज्युनिअर कॉलेज व कमलाबाई नामदेवराव आमले पब्लिक स्कूल हिवरखेड यांच्या संयुक्त विद्यमाने बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.सर्वप्रथम बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याप्रसंगी मान्यवर व्यक्तींनी विचार व्यक्त केले. हिवरखेड



येथील वृत्तपत्र विक्रेता तसेच बातमीदार जितेंद्र फुटाणे व अरविंद भुंते यांच्या प्रदिर्घ निस्सिम सेवेबाबत त्यांचा शाल व श्रीफळ देऊन संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका कल्पना महल्ले यांनी केले. आभार मोहिनी ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्या वैशाली आमले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पत्रकारिता या विषयावर विषयावर आपले विचार व्यक्त केले व लोकशाहीच्या मजबुती करीता हा चौथा स्तंभ मजबुत व निष्पक्ष असणे कसे गरजेचे आहे. या बाबत सविस्तर विवेचन करुन पत्रकारीतेचे महत्व समजावून सांगितले. या प्रसंगी मोठ्या संख्येने शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वाचक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाकरीता दिपाली सदाफळे, रश्मीता तडस, पुजा सदाफळे, निकिता ढोरे, रेवती ढोरे, निकीता भेले, माधुरी वरखेडकर, गीता चावके, तेजेश्वर आकोलकर, निखिल जपुलकर यांनी परिश्रम घेतले.

# वेदनेला अंत नाही अन् कुणालाही खंत नाही!

## कडाक्याच्या थंडीत पिकांसाठी शेतकऱ्यांची धडपड

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.10 )–** जगाचा पोशिंदा शेतकरी हे विधान सत्य असले तरी, राजकारण्यांसाठी हे ब्रीद केवळ कांगावा करून मत जिंकण्याचे माध्यम ठरले आहे. शेतात असलेल्या कोवळ्या पिकांना जगवण्यासाठी शेतकऱ्यांना आता अंधार यातना भोगाव्या लागत आहेत. दिवसभर शेतात राबायचे आणि रात्रभर ओलितासाठी जागायचे, असे धोरण महावितरणने हाती घेतल्याचे दिसून येत आहे. या गंभीर प्रकारामुळे शेतकऱ्यांना वेदना सहन कराव्या लागत आहे. परंतु, या गंभीर प्रश्नावर लोकप्रतिनिधी मात्र गप्प असून कुणालाही खंत नसल्याचे तालुक्यात चित्र आहे.



सध्या थंडीचा जोर वाढत चालला असून शेतशिवारामध्ये रब्बी पिकांना ओलिताचे काम सुरू आहे. दिवसभर काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला मात्र दिवसा वीज कमी मिळत असल्याने रात्री जागरण करीत पिकांना पाणी द्यावे लागते आहे. निसर्गापाठोपाठ विद्युत वितरणही शेतकऱ्यांच्या जिवावर उठले असून शेतकऱ्यांनीच रात्रभर का जागावे? असा प्रश्न निर्माण झाला आहे. एकीकडे निसर्गाच्या असमतोलामुळे सततच्या ओला व कोरडा दुष्काळ आधीच आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचे संकट उभे आहे. तर दुसरीकडे राज्य सरकारने शेती आणि शेतकरी यांच्या बाबत घेतलेले धोरण, काही निर्णय हे शेतकऱ्यांसाठी अडचणीचे ठरत आहे. तालुक्यात महावितरणकडून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवस व रात्री असा वीजपुरवठा केला जातो. त्यातच दिवसा होणाऱ्या वीजपुरवठा तांत्रिक दुरुस्ती नावाखाली तासनतास खंडित असतो. रात्री ओलितासाठी शेतात जातांना शेतकऱ्यांना जीव मुठीत घेऊन ओलित करावे लागते. शेतशिवारात वन्य प्राण्यांचा मुक्त संचार असतो. हे वन्यजीव कधी शेतकऱ्यांवर हल्ला करतील याचा नेम नाही. त्यातच सर्प, विंचू यांच्या सोबतीने दहशतीत शेतकरी रात्रभर शेतात उभे राहून मोठ्या कष्टाने शेतात पेरलेले पीक जगवण्यासाठी हा संघर्ष अतितीव्र बनला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना सिंचनाचे काम करताना असंख्य अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

रात्रीला महावितरणचा वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर रोहित्रावर अनेक तांत्रिक बिघाड होत असतात. ते विजेची उपकरणे दुरुस्तीसाठी रात्रीच्या वेळी धावपळ करावी लागते.

> अनियमीत, कमी दाबाचा व वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे, संत्रा, केळी, गहू व हरभरा चे ओलीत करणे कठिण झाले आहे. ओलीताला रात्रीचा वीज पुरवठा तर, शेतकऱ्यांसाठी अधिकच धोकादायक आहे. रात्री, अपरात्री सोबतीला माणसं ठेवून ओलीत करावे लागते. याची आर्थिक, मानसिक व जीवित्वाची झळ फक्त शेतकऱ्यांनाच सहन करावी लागते. याचा विचार शासन व विज वितरण कंपनी कधीच करत नाही.
>
> **बाबासाहेब लंगोटे,**
> **शेतकरी,थुगांव (पिंपरी), चांदूरबाजार**

> विद्युत पंपाच्या विज पुरवठ्याचे शेड्युल हे प्रत्येक महिन्याला, डिव्हिजन स्तरावरून तयार करण्यात येते. तसेच कमी दाबाच्या विज पुरवठ्याचे मुख्य कारण, शेतकऱ्यांनी आपल्या पंपांची वाढविलेली अश्व शक्ती आहे. पाच एच.पी पंप धारकांनी साडे सात एच.पी.चे पंप बसविले. तर साडे सात एच.पी धारकांनी दहा एच.पी.चे पंप बसविले आहेत. त्यामुळे विज पुरवठ्याचा दाब कमी जास्त होतो. शेतकरी पंप बदलल्याची माहिती विज वितरण कंपनी ला देत नाहीत. परिणामी कमी दाबाच्या ट्रान्सफॉर्मर वर जास्त दाबाची वीज ओढल्या जाते. त्यामुळे काही ठिकाणी कमी दाबाचा वीज पुरवठा होतो.
>
> **दिनेश भागवत,**
> **उप कार्यकारी अभियंता,**
> **विज वितरण कंपनी, चांदूर बाजार.**

रात्री होणाऱ्या थ्री फेज वीज पुरवठ्यामुळे शेतातील पिकांना पाणी देणे धोक्याचे ठरत आहे. परिणामी शेतकरी वर्ग वीजवितरण कंपनीवर नाराजी व्यक्त करीत आहे. याउलट औद्योगिक वसाहतीला 24 तास वीज पुरवठा केला जातो.

तर शेतीसाठी रात्रीचा विद्युत पुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ होत आहे. जिल्ह्याचे पालकत्व सांभाळणाऱ्या मंत्र्यांनी लोकप्रतिनिधींनीही याकडे तत्काळ लक्ष देऊन कृषिपंपांना सातही दिवस दिवसा वीज पुरवठा करावा. शेतातील पिके जगतील, तरच शेतकरी जगेल. अशी भावना शेतकरी व्यक्त करीत आहे.

# दहीगाव शाळा जनरल चॅम्पियनची मानकरी

## प्राथमिकमध्ये सातेफळ, माध्यमिकमध्ये दहीगाव, सांस्कृतिकमध्ये चांदूरवाडी अव्वल

### तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.10 )–** तालुकास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सव तथा उल्हास मेळावा दि.7 व 8 जानेवारी रोजी श्री मन्नालाल गुप्ता विद्यालय चांदूर रेल्वे येथे आयोजित करण्यात आला. या स्पर्धेत जि.प.पूर्व माध्यमिक शाळा दहीगाव धावडे ही शाळा जनरल चॅम्पियनची मानकरी ठरली. प्राथमिक शालेय गटात विद्यामंदिर पूर्व माध्यमिक शाळा सातेफळ, माध्यमिक गटात जि.प.पूर्व माध्यमिक शाळा दहीगाव धावडे तर सांस्कृतिक स्पर्धेत जि.प.पूर्व माध्यमिक शाळा चांदूरवाडी यांनी बाजी मारत चषकाचे मानकरी ठरले.




दोन दिवसीय क्रीडा स्पर्धेचा समारोपीय तथा बक्षीस वितरण सोहळा दि. 8 जानेवारी रोजी दुपारी 3 वाजता श्री मन्नालाल गुप्ता विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन कडू यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नायब तहसिलदार अनिल चवरे, सुधाकर अनासाने, माजी पं.स.सदस्या प्रिती तिजारे, गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे, सहायक प्रशासन अधिकारी गजेंद्र पाटील, शिवाजी शिक्षण संस्था शाळा तपासणी अधिकारी मधुकर रोडे, माजी गटशिक्षणाधिकारी मुरलीधर राजनेकर, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सुधीर केने, प्रा.रवींद्र मेंढे, नामदेव मार्डीकर, मुख्याध्यापक उमेंद्र ढगे , विस्तार अधिकारी रवींद्र दिवाण, गटसमन्वयक मंगेश उल्हे, केंद्रप्रमुख राजेंद्र तामस्कर, राजेंद्र वानखडे, केशव राठोड, गणेश वासनकर, सुरेश दामले,श्रीमती सविता अ.देशमुख आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. प्राथमिक विभागातून कबड्डी (मुले), कबड्डी (मुली),खो–खो(मुले), लंगडी स्पर्धेत विद्यामंदिर पूर्व माध्यमिक शाळा सातेफळने बाजी मारली. खो–खो (मुली)स्पर्धेत जि.प.पूर्व माध्यमिक शाळा कळमगाव अजिंक्य ठरली.

वैयक्तिक स्पर्धेतील धावणे,उंच उडी(मुली),लांब उडी (मुली),दोरीवरच्या उड्या स्पर्धेत विद्यामंदिर पूर्व माध्यमिक शाळा सातेफळ यांनी उंच उडी (मुले) व लांब उडी(मुले) स्पर्धेत जि.प.शाळा मालखेड व धावणे (मुली) स्पर्धेत जि.प. पूर्व माध्यमिक शाळा दहीगाव धावडे यांनी बाजी मारली.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे संचालन वैशाली ढाकुलकर यांनी तर स्पर्धेचे परीक्षण श्रीकृष्ण विद्यालय आमलाचे प्रा.रवींद्र मेंढे, सीसीएनचे संचालक अमोल गवळी यांनी केले. या समारोपीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक राजेंद्र वानखडे यांनी संचालन कुणाल ठाकरे तर आभार रवींद्र दिवान यांनी मानले यांनी मानले.